**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2016 = 4.44, www.srjis.com***
*UGC Approved Sr. No.48612, OCT- NOV 2017, VOL- 4/24*

# अंध विद्यार्थि व एकात्मिक शिक्षण आणि शिक्षकांची भूमिका

**ज्योत्स्ना मोहन कांबळे**

*सहायक प्राध्यापक, टिळक शिक्षण महाविद्यालय*

Email- jotsnasonawane@gmail.com

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

खरे तर हा मानव जन्मच निसर्गाची फार मोठी देणगी आहे. मानव शरीरात डोळ्याचे स्थान फार महत्वाचे आहे. डोळे म्हणजे मनाच्या दोन खिडक्या आकाशात जसे सुर्य, चंद्र , तसे मानवी शरीरात दोन डोळे. डोळे म्हणजे प्रकाशाचे पुंजच. या पृथ्वीतलावरील सर्व सौंदर्य डोळयांमुळेच दिसते. हे सारे जग म्हणजे डोळयांचाच उत्सव होय. हिंदी कवी बिदारीने यास 'नयनोत्सव' असे म्हटले आहे. खरे तर हे सारे जग डोळयांपुरतेच आहे डोळे आहेत म्हणून जग आहे. जग आठवते. 'If I hear, I forgate If I see Irememberʼ. आम्ही पाहतो म्हणून लक्षात ठेवतो जगातील सारे सौंदर्य हे डोळ्यांनीच पाहता येते. डोळ्यांनी जे दिसते ते कधी आनंददायक असते तर कधी दुःखदायकही असते. पण डोळयांनी जे दिसतच नाही ते कोणत्या डोळ्यांनी पहायचे ? अंत:चक्षूनी मनूष्याला हे जग पाहता येते. हिंदी कवी सूरदास आणि कवी गुलाब महाराज यांनी अंत:चक्षूनी रंगविलेली शब्दचित्रे वाचली की डोळे असलेले लोक किती आंधळे असतात ते पटते आज जगात इतक्या वाईट गोष्टी दिसतात की, त्यावेळी आपणास डोळे नसलेलेच बरे असे अनेकदा वाटते. 'डोळे हे जुलमी गडे' असे कवी म्हणतो, डोळेच धोकेबाज असतात. फसवितात. डोळ्यांनी जे दिसते ते सारेच सत्य नसते 'दुरुन डोंगर साजरे' म्हणतात. त्याचा अर्थ ही असाच आहे जे दिसते ते सारेच सुंदर नसते. दिसणारे जग जर सुंदर नसेल तर सुंदर जग कोणत्या डोळ्यांनी शोधायचे ? जग कसे आहे, यापेक्षा कसे असावे याचे सुंदर चित्र अंध मनुष्यच रेखाटू शकेल.अंध हा डोळे असलेल्या माणसा इतकाच समाजाचा घटक असतो. त्यालाही सुखाने जगण्याचा अधिकार असतो. पण त्यांनी सुखी जीवनाचा लाभ मिळावा म्हणून विचार करत बसण्यापेक्षा त्यांच्यासाठी काम करत बसण्याची नितांत गरज आहे,अंध हे भीक मागण्याशिवाय कोणतेही काम करण्यास तयार असतात, जे अंध भीक मागतात, त्यास डोळे असून आंधळा असलेला समाज जबाबदार आहे.आंधळ्यांना जे जग दिसत नाही. त्यामुळे 'सात आंधळे आणि हत्ती' ही गोष्ट प्रसिध्द आहे. या जगाचा जो अनुभव ज्या अंधास येतो त्याला जग तसे वाटते. वाटणे आणि असणे यात जमीन आस्मानाचा फरक असतो. हे अंधांच्या लवकर लक्षात येत नाही. त्यामुळे त्यांना अनेक दु:खांना तोंड द्यावे लागते. खरे तर सगळेच अंध स्वावलंबी होऊन जगू इच्छितात. पण जगच कधीकधी त्यांना तसे जगू देत नाही. जग इतके वाईट आहे की डोळे असलेल्या मुलाला आंधळे करुन रस्त्याच्या कडेला भीक मागत बसण्यासाठी त्याचा उपयोग

करते म्हणून अंधांना समाजाची कसल्याही प्रकारची दया नको असते. त्यांना स्वाभिमानाने जगायचे असते म्हणून त्यांना वेगवेगळ्या कामासाठी संधी उपलब्ध करुन देणे अधिक चांगले असते. यासाठी अंध शिक्षण प्रशिक्षण जाणत्या नजरेने करण्याची मोठी गरज आहे. अंधांना काम पाहिजे, दयेची भीक नको. यासाठी अंधांच्या शिक्षणावर विविध प्रकारच्या उद्योगांना स्थान दिले पाहिजे अंध शिक्षण प्रशिक्षणाच्या संस्थाचे जाळे निर्माण केले पाहिजे. निदान प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी अंधशाळा उघडली पाहिजे. अंधांचे मेळावे घेतले पाहिजे.विविध स्पर्धा घेतल्या पाहिजेत या सर्व गोष्टींपेक्षा अंधांना समाजाचे प्रेम पाहिजे, मार्गदर्शन पाहिजे. अंधाचे जीवनामध्ये अनेक प्रकारच्या समस्या येत असतात. त्यांच्या शैक्षणिक समस्या काय आहेत. हे शोधणे व अंध हे सर्व सामान्यांबरोबर शिक्षण घेत असतात तर त्यांच्या अनेक प्रकारच्या समस्या उद्भवतात. Edgard Dell यांच्यामते आपण वेगवेगळ्या इंद्रियाद्वारे ज्ञान संपादन करत असतो या सर्व इंद्रियापैकी सर्वात महत्वाचे इंद्रिय म्हणजे डोळा होय. त्यांच्या मते आपण डोळ्यांच्या सहाय्याने जवळजवळ ८०% ज्ञान घेत असतो, व बाकीचे २०% ज्ञान इतर इंद्रियांद्वारे घेत असतो म्हणूनच मानवी शरीरामध्ये डोळ्यांचे फार महत्व आहे. अंधत्वाच्या बाबतीत युगानुयुगे संमिश्र भावना व्यक्त करण्यात येत आहे. कधी अंधांची कीवकेली जाते. तर कधी त्यांनी संपादन केलेल्या यशाबद्दल कौतुक केले जाते. त्यांच्याकडे असहाय्य व्यक्ती म्हणून पाहिले जाते. अंध व्यक्ती समाजातील कमजोर वर्गापैकी एक आहेत. त्यांची खूप काळजी व म्हणून  अंधांसाठी समाजाने त्यांना संरक्षण देण्याची गरज आहे. त्यांचे जीवन आनंदमय होऊन जाईल

**एकात्म शिक्षण योजना :-**

बौध्दिक किंवा शारीरिक अपसामान्यत्व सौम्य पातळीवर असलेल्या मुलींना सामान्य शाळेत घालणे म्हणजे एकात्म शिक्षण योजने अंतर्गत शिकवणे होय. प्रस्तुत संशोधना संदर्भात ज्या सामान्य शाळांमध्ये अंध मुलींचाही समावेश आहे अशा शाळांना एकात्म शिक्षण योजना असलेल्या शाळा असे संबोधले आहे.

अंध विद्यार्थि :- अंध विद्यार्थिनी म्हणजे ज्यांची दृष्टी कमी अथवा अजिबात नाही अशा विद्यार्थि होय.

**एकात्मीकरणाची गरज :-**

१) विशेष दक्षतेची गरज ज्या मुलांना असते त्या सर्वांना समाजात सर्वांसमवेत वावरावे लागते. शाळा हे सामाजिकीकरणाचे उत्तम माध्यम आहे. समाजात योग्य प्रकारे मिसळण्याची, योग्य वर्तन करण्याची सवय शाळेतच लागते. विशेष शाळांपेक्षा असे शिक्षण सामान्य शाळेतच अधिक चांगले होईल.

२)अशा प्रकारच्या सर्व मुलांना विशेष शाळांची आवश्यकता देखील नसते. ते सामान्य शाळांमध्ये देखील आपली प्रगती नीट करु शकतात. त्या दृष्टीने एकात्मीकरणाची ही गरज आहे.

३)सर्व सामान्य मुलांनी अशा मुलांना आपले मित्र म्हणूनच आपल्यातच सामावून घेतले पाहिजे. सर्व सामान्य मुलांच्या मानसिक, सामाजिक विकासाच्या दृष्टीने एकात्मिकरण गरजेचे आहे.

४)सर्वांसाठीच्या विशेष शिक्षणाचा खर्च न परवडणारा आहे. एकात्मिक शिक्षण आणि आवश्यक तेथेच विशेष शाळा हे धोरण आर्थिक दृष्टीने देखील गरजेचे आहे. (दुनाखे १९९७ पृ.क्र. १७७)

वरील विधानाला दुजोरा देणारे अपंग शिक्षण योजने संबंधी व एकात्मिकरणाविषयी विचार पुढे मांडले आहेत.

In the special programmes which alone have been developed so far in our country, the handicapped children are isolated from the normal ones and placed in special institutions. In the educationally advanced countries, however a great deal of stress is now being laid one the integration of handicapped children into the regular school programmes. This several advantages of which two are important.

1) Reduction of costs, 2) Promoting mutual understanding between handicapped and non-handicapped children. This has also its disadvantages for instance, many handicapped children find it psychologically disturbing to be placed in an ordinary school. (Report of Education commission 1964-66)

**एकात्म शिक्षण पध्दतीचे प्रकार :-**

एकात्म शिक्षण पध्दती अर्धवेळ किंवा पूर्णवेळ असू शकते.

**१)अर्धवेळ शिक्षण पध्दती :-**यात जर अंध मुलांना सामान्य शाळेतील सर्वच विषय शिकणे अवघड वाटत असतील तर त्या विषयांऐवजी हस्त व्यवसाय, कला, मुक्त व्यवसाय, खेळ इ. साठी सामान्य शाळेत पाठवायचे व भाषा विकास होईल व सामान्य शाळेत इतर विषयांसाठीगेल्यामुळे वातावरणात राहण्याची संधी मिळेल व संपर्कासाठी श्रवण व स्पर्शाचा वापरकरण्यास वाव मिळेल.

**२)पूर्णवेळ शिक्षण पध्दती :-** यात मुलांचा सामान्य शाळेतील सर्व शैक्षणिक व इतर कार्यक्रमातसहभाग होतो. ह्याचा मुख्य उद्देश म्हणजे सामान्य विद्यार्थ्यांबरोबर व्यवहार केल्यामुळे वविचारांची देवाण घेवाण करायची कुवत वाढल्यामुळे त्याला आपले सुप्त सामर्थ्य कळून येते.Bitter etal यांनी इ.स. १९७३ मध्ये प्रसिध्द केलेल्या रिपोर्टमध्ये खालील प्रकारच्या एकात्म शिक्षण पध्दतीचा उल्लेख केला आहे.

**१) स्टैंडर्ड एकात्म शिक्षण पध्दती :-** यात अंध मुले सामान्य वर्गात सामान्य मुलांबरोबर अर्धवेळ किंवा पूर्णवेळ शाळेत अध्ययन करतात. अशा मुलांना सामान्य शिक्षिकाच शिकवते.

**२) क्रॉस एकात्म शिक्षण पध्दती:-** यात सामान्य शिक्षिका व विशेष शिक्षिका दोघीही एकमेकींच्या विद्यार्थ्यांना शिकवतात. सामान्य शिक्षिका काही वेळा अंधांना शिकवते तर काही काळ सामान्यांना शिकवते. तसेच विशेष शिक्षिका काही वेळ सामान्यांना व काही वेळ अंधांना शिकवते.

**३) रिव्हर्स एकात्म शिक्षण पध्दती:-** यात दररोज एक किंवा त्याहून अधिक सामान्य मुले अंधांच्या वर्गात एक किंवा त्याहून अधिक तासांना बसतात व शिकतात.इ.स. १९८३ च्या शैक्षणिक धोरणात एकात्म शिक्षण योजना तयार झाली प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाची उद्दिष्टपूर्ती करण्यासाठी एकात्म शिक्षण योजना ही एक पूरक योजना म्हणतात.

**एकात्म शिक्षण पध्दतीच्या गुण दोषांचा आढावा पुढील प्रमाणे :-**

**गुण :**

१)शैक्षणिक व सामाजिक क्षितिजे रुंदावतात.

२)सामान्य मुलांबरोबर आंतरक्रिया होऊन व्यक्तीमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊ शकतो

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

३)आव्हानात्मक वातावरण राहिल्यामुळे व्यक्तिमत्वाचा पूर्ण विकास होऊ शकतो.

४) विशेष दक्षतेची गरज असणारी मुले आणि सामान्य मुले या दोघांचा योग्य विकास होतो.न्युनगंड अथवा अहंगंड जोपासला जाण्याची शक्यता कमी होते.

५) ज्या खेड्यांची लोकसंख्या कमी आहे तिथे विशेष दक्षतेची गरज असणारी मुले व त्यातून विशेष शाळांची गरज असणारी मुले कमी असतात. अशा वेळी विशेष शाळा काढणे परवडत नाही.

**दोष :-**

१)दृष्टी नसल्यामुळे सामान्य मुलांशी चटकन मैत्री होऊ शकत नाही.

२)काही मुले न्युनगंड निर्माण झाल्यामुळे प्रगती करु शकत नाहीत.

३)वर्गशिक्षिका व विशेष शिक्षिका यांच्यात विचारांची देवाण घेवाण झाली नाही तर मुलांची प्रगती मंदावण्याचा संभव असतो.

४)स्पर्धात्मक वातावरण सामावले गेले नाही तर शिक्षणाबद्दल उदासिनता निर्माण होऊ शकते.

५)पालकांचे सहकार्य नसेल तर विशेष शिक्षिकेचे शाळा तासिकांपैकी काहीच तासिकांचे अध्यापन अपुरे पडू शकते.

६) अशा शाळेत इतर शिक्षक जागृत नसतील तर अपेक्षित शालेय वातावरण, विशेष दक्षतेच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष सोयी,

काही विशेष अध्ययन अनुभूती यांचा अभाव असतो याचा परिणाम या विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होतो.

७)व्यवसाय प्रशिक्षणासाठी शाळे शिवाय इतर ठिकाणी जावे लागते. त्यामुळे वेळ, पैसा, श्रम खर्च होतो.

**एकात्मिक शिक्षणामध्ये शिक्षकांची भूमिका**

1) एकात्मिक शिक्षणामध्ये शिक्षकाची मानसिक तयारी पाहिजे

2)एकात्मिकशिक्षण ही सर्वसाधारण शिक्षणाचे च्या विकासाची तयारी आहे हे समजून घेतले पाहिजे

3) विशेष मुलांच्या गरजा व सर्वसामान्य मुलांच्या गरजा ओळखता आल्या पाहिजेत

4) शिक्षकांना सर्व स्तरावरील अडचणी जाणून घेता आल्या पाहिजेत

5) नैतिक बहुतेक अध्यापन शास्त्रीय वातावरण तयार करणे

6) सर्व मुलांना यशस्वी होण्यास अनुकूल वातावरण करणे

7) या संदर्भातील योग्य प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे

8) उपक्रम राबविण्यात पूर्वी तज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक

9) शैक्षणिक दृष्टिकोनातून मुलांमधील विविधता लक्षात घेणे

10) मुलांच्या वैयक्तिक मतभेदाचे ज्ञान असणे आवश्यक

11) शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये परिवर्तनशीलता वापरण्याची शिक्षकाकडे इच्छा असली पाहिजे

12) व्यावसायिक सेवा आणि प्रशिक्षण यासाठीची तत्परता दाखविणे आवश्यक

13) स्वतःच्या अध्यापन कार्यात समाधान मिळवणे आवश्यक

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

14) विविध विकासात्मक विकार असलेल्या विद्यार्थ्यांच्या भावनिक स्वीकृती करता आले पाहिजे

15) बौद्धिक अपंग मुले ते जाणून-बुजून सामूहिक शाळेचा अभ्यास घेण्यास सक्षम होणार नाहीत त्यासाठीचा शिक्षकांनी प्रयत्न करणे आवश्यक

16) एकात्मिक शैक्षणिक कार्यक्रम शाश्वत होण्यासाठी काही वेळा या विश्वास आणि मूल्ये स्पष्ट केली पाहिजे

17) विद्यार्थ्याचे गटातील कार्य आणि गट समस्येचे निराकरण करण्यात सहभागी होण्यासाठी प्रयत्न

18) कार्यक्षमता खेळ प्रकल्प प्रयोगशाळा क्षेत्र संशोधन याबाबत शिकण्याचे सक्रिय प्रकार वापरणे आवश्यक.

**References**

*काळे प्रे, 'अपवादात्मक बालकांचे मानसशास्त्र' मॅजेस्टिक प्रकाशन, 316 प्रसाद चेंबर्स,*
*प्रथम आवृत्ती, ऑक्टोबर 1990*
*गोखले श.दा. 'अपंगाची हाक (प्रथम आवृत्ती) चिरंजीव प्रकाशन, टिळक रस्ता पुणे – 1965*
*डॉ. दुनाखे अरविंद - 'शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन आणि समुपदेशन'*
*नुतन प्रकाशन पुणे 1997.*
*देशपांडे लि. दुनाखे अ, शिक्षणाचे समाजशास्त्र : एकरुप रेषा नुतन प्रकाशन पुणे १९९७*
*योजना अंधत्व निवारण्याचे प्रयत्न' (मे 1997 अंक - 10)*
*शिक्षण आणि समाज, इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन ऑक्टो. 1998, मार्च 1999 (अंक 1 व 2)*
*शिक्षण संक्रमण, सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ, पुणे*
*(1996 अंक 4 ,1997 फेब्रुवारी अंक 2,1998 एप्रिल/ जून अंक 4 व 6)*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*